ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume–X, Issues–III May - June 2021

# कोव्हीड काळातील शिक्षण

श्री. राकेश अशोक रामराजे
*सहाय्यक प्राध्यापक*
*पी.व्ही.डी.टी. कॉलेज ऑफ एज्यूकेशन फॉर वूमेन,*
*एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई 20*

*सारांश :*

*गेल्या एक वर्षापासुन कोराना या आजाराने संपूर्ण जगात मोठया प्रमाणात थैमान घातले आहे. या आजाराने संपूर्ण जगात मृत्युचे तांडव पसरवलेले आहे. या आजारामुळे संपूर्ण जग थांबले गेले. जगातील प्रत्येक क्षेत्रात या आजाराचा परिणाम झालेला दिसुन येतो. उदा. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्र इत्यादी आर्थिक क्षेत्र फार कोलमडुन गेले आहे. तर शैक्षणिक क्षेत्रात फार मोठया प्रमाणात बदल झालेला दिसुन येतो.*

*Aarhat Publication & Aarhat Journals* **is licensed Based on a work at** *http://www.aarhat.com/eiirj/*

**मुख्य संज्ञा :** कोव्हीड, शिक्षण

**प्रस्तावना :**

शिक्षण हे व्यक्तीला स्वतः च्या पायावर आत्मविश्वासाने उभे राहण्यास मदत करते. शिक्षण व्यक्तीच्या वर्तनात अपेक्षित व कायम स्वरुपाचा बदल घडवून आणते. शिक्षणाने व्यक्तीच्या सुप्तगुणांचा विकास घडवून आणला जातो. शिक्षणाने व्यक्तीचा सर्वांगिण विकास घडवला जातो. समाजात वावरतांना व्यक्तीने कसे वागावे व कसे वागु नये शिक्षणाने शिकवले जाते. गेल्या दोन वर्षात पारंपारिक शिक्षण पध्दती बदल होऊन ऑनलाईन शिक्षण पध्दती पुढे आली.

**पारंपारिक शिक्षण पध्दती :**

पारंपारिक शिक्षण पध्दतीमध्ये प्रत्यक्ष शिक्षक व विद्यार्थी एकमेकांसमोर असतात, अध्यापन व अध्ययन कार्य समोरासमोर होत असते त्यामुळे विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्या त्यांच्या चेहऱ्याच्या हावभावाद्वारे किंवा शारिरीक हालचालीद्वारे शिक्षक समजु शकत असे व त्यावर तात्काळ उपययोजना करत असे. तसेच पारंपारिक शिक्षणाद्वारे विद्यार्थी प्रत्यक्ष शाळेत जाऊन अध्ययनाचे कार्य पूर्ण करत असे त्याचबरोबर आपल्या समवयस्क गटातील विद्यार्थ्यांसोबत वेळ घालवत असे त्यामुळे त्याच्यात सहकार्याची भावना वाढीस लागत असे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होत असे. तसेच शालेय वातावरणात विविध प्रकारचे क्रिडा घेण्यात येत असे. त्याचा परीणाम विद्यार्थ्यांच्या शारिरीक क्षमता वाढविण्यावर होत असे. परंतु मागील एक वर्षापासुन कोराणा या आजारामुळे शाळा बंद करण्यात आल्या आणि विद्यार्थ्यांना ऑनलाईन द्वारे शिक्षण देण्याचे कार्य करण्यास सुरुवात झाली. या ऑनलाईन शिक्षणात अध्यापन व अध्ययन प्रक्रियेचे स्वरुप बदलून गेले.

**ऑनलाईन शिक्षण :**

या ऑनलाईन प्रक्रियेत शिक्षक विविध ऑनलाईन प्लॅटफॉम चा वापर अध्यापनाचे कार्य करु लागले, तर विद्यार्थी या ऑनलाईन प्लॅटफॉम च्या माध्यमावर उपस्थित राहून अध्ययन करु लागले पण याचा फायदा शिक्षकांना किती झाला व विद्यार्थ्यांना किती झाला हे सांगणे थोडे कठीनच आहे. परंतु या पध्दतीत बरेच काही फायदे व तोटे समजुन आले तर भरपुर असे तंत्रज्ञानाच्या विश्वात फिरता आले.

**ऑनलाईन अध्यापनाचे शिक्षकांना झालेले फायदे :**

1. विविध तंत्रज्ञानाची ओळख शिक्षकांना झाली.
2. तंत्रज्ञान कसे हाताळावे हे समजले.
3. बदलत्या काळात स्वतःचे समायोजन कसे करावे हे समजले.
4. पाठयपुस्तकाव्यतीरीक्त मोठा आशय इंटरनेट वर उपलब्ध आहे ते कसे शोधावे हे समजले.
5. घटकाची माहिती इंटरनेटच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांसमोर चांगल्या पध्दतीने सादर करता आले.
6. तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांषी संवाद साधन्यासाठी आलेल्या अडचणी समजल्या.
7. ऑनलाईन परीक्षा कशी घ्यावी हे समजले.
8. विविध सोशल साईट यांची माहिती मिळून त्याचा वापर कसा करावा हे समजले.
9. भविष्यात जर अशी परिस्थिती निर्माण झाली तर विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबणार नाही त्यासाठी आवश्यक उपाययोजन काय कराव्यात हे समजले.

**ऑनलाईन अध्यापनात शिक्षकांना आलेल्या अडचणी :**

1. सुरुवातील तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा हे समजत नव्हते.
2. सर्वच विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित असतातच असे नाही.
3. ग्रामिण भागातील मुलांचा या ऑनलाईन शिक्षणात समावेश करतांना अडचणी आल्यात.
4. सर्वच विद्यार्थ्यांकडे वैयक्तीक लक्ष देणे शक्य झाले नाही.
5. कधीकधी इंटरनेट कनेक्टीव्हीटी नसल्यामुळे तास घेणे शक्य होत .
6. विद्यार्थ्यांकडून जे पटकन प्रत्याभरण मिळायला हवे ते मिळत नाही.
7. कॅमेरा चालू असेल तर विद्यार्थी पाठाकडे लक्ष देतो की नाही हे समजते पण बंद असेल तर विद्यार्थ्याकडे लक्ष देणे शक्य होत नाही.
8. शिक्षणाची जी ध्येये ठरवली आहेत ती साध्य होण्यास अडचणी निर्माण होतात.
10. विद्यार्थ्यांचा बौध्दीक विकास करता येतो पण सामाजिक, भावनिक, शारिरीक विकास करता येत नाही.

ऑनलाईन पध्दतीने जे शिक्षक व विद्यार्थी यामध्ये विद्यार्थी हा घटक फार महत्त्वाचा ठरला शिक्षकाने अध्यापनाचे कार्य केले पण त्या कार्याला विद्यार्थ्यांची अध्ययनाची जोड कीती मिळाली हा एक प्रश्नच आहे कारण पारंपारिक अध्ययन प्रक्रियेत विद्यार्थी प्रत्यक्ष शिक्षकासमोर वर्गात इतर विद्यार्थ्यासमोर उपस्थित असतो तो आपली समस्या वर्गातील शिक्षक व विद्यार्थ्यांशी चर्चा करुन सोडवू शकतो पण ऑनलाईन अध्ययनात तसे होतांना दिसत नाही.

त्याचबरोबर वारंवार मोबाईलच्या स्क्रीन कडे बघुन विद्यार्थी कंटाळतो व त्यांचे डोळे पण दुखतात. पारंपारिक शिक्षण पध्दतील शिक्षक शाळेत जो गृहपाठ देत ते तपासत असे पण ऑनलाईन पध्दतीत तसे होतांना दिसत नाही. इंटरनेटच्या माध्यमातुन शिक्षक घटकाशी संबंधित भरपुर माहिती विद्यार्थ्यासमोर सादर करतो त्याचा परिणाम म्हणजे विद्यार्थ्याचे आशयज्ञान वाढण्यावर झाला. ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती खराब आहे त्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणाचा खर्च परवडणारा नसतो त्याचा परिणाम त्यांच्या शिक्षणावर झालेला दिसतो. खेडेगावात आर्थिकस्थिती बरोबरच इंटरनेच्या कनेक्शनची समस्या फार मोठया प्रमाणात दिसुन आली त्याचा परिणाम म्हणजे अध्यापनात व अध्ययनात जे सातत्य असायला हवे होते ते जास्त दिसले नाही. पारंपारिक अध्यापन व अध्ययन प्रणालीत वर्गात विद्यार्थी शिक्षक एकत्र वावरत असतात त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासावर होतांना दिसतो. विद्यार्थ्यामध्ये संवेदनशिलता, सौजन्यशिलता, भावनिक एकात्मता, सहकार्य वृत्ती, जबाबदारीची जाणीव विकसित होत असते. पण ऑनलाईन अध्यापन अध्ययन प्रणालीत तसे होत नाही.

**ऑनलाईन शिक्षण प्रणालीत पालकांची भूमिका व समस्या :**

कोराणाच्या काळात पालकांवर फार मोठा आर्थिक भार पडला. लॉकडाऊन मध्ये सर्व व्यवहार बंद झाले काहिंच्या नोकऱ्या गेल्या साहजिकच त्याचा परिणाम कुटुंबावर झाला. ऑनलाईन शिक्षण म्हटले तर ॲन्ड्रॉईड फोन त्याला इंटरनेट कनेक्शन या दोन गोष्टींची साथ असणे गरजेचे आहे पालकांना या दोन गोष्टी जमवतांना आर्थीक समस्येला सामोरे जावे लागले. तसेच घरात दोन पाल्य असतील तर अजुनच समस्या निर्माण झाल्यात एक म्हणजे दोघांचे एकाच वेळी ऑनलाईन तास मोबाईल एक याचा परिणाम झालेला दिसला.

वरील अडचणी खुप असल्या तरी एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की, कोरोणा सारख्या समस्या आल्यात तरी ऑनलाईन शिक्षणाद्वारे शिक्षणाच्या प्रवाहात विद्यार्थ्यांना सामावून घेता येते तसेच तसेच त्यांच्या अध्ययनात खंड पडु देता येत नाही.

**संदर्भ :**

1. https://www.weforum.org/agenda/2020/04/coronavirus-education-global-covid19-online-digital-learning/
2. https://timesofindia.indiatimes.com/readersblog/zita-janice/covid-19-and-its-impact-on-education-system-35076/
3. https://journals.sagepub.com/doi/full/10.1177/2347631120983481
4. https://www.hindustantimes.com/cities/mumbai-news/one-year-of-covid-19-online-mode-a-big-lesson-for-education-system-101615145414568.html